# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.03.2026** **वार- गुरुवार**

---

**गॅस काळाबाजार**

पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन आणि गॅस पुरवठा साखळीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर गॅसचा काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने धडक मोहीम सुरू केली आहे. महसूल आणि पुरवठा विभागाने विविध गॅस वितरकांच्या साठ्यांची तपासणी सुरू केली असून, वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याच्या सक्त सूचना गॅस वितरण कंपन्यांना देण्यात आल्या आहेत.

**पीएम किसान**

अग्रीस्टॅक योजनेत नावनोंदणी न केलेले, पुणे जिल्ह्यातील सुमारे 61 हजार शेतकरी, पीएम किसान सन्मान निधीचा लाभ घेत आहेत. अशा शेतकऱ्यांची घरोघरी जाऊन पडताळणी केली जाणार आहे. संबंधित शेतकरी पीएम किसान योजनेच्या निकषांत बसत नसतील, तर त्यांचा लाभ बंद करावा, असे स्पष्ट आदेश पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत. प्रत्येक शेतकऱ्यानं अग्रीस्टॅक अर्थात शेतकरी ओळख क्रमांक योजनेत नाव नोंदणी करण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

**रिंगरोड**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीनं महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या अंतर्गत रिंग रोड प्रकल्पासाठी जमीन संपादन प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. यासाठी पीएमआरडीएनं 11 गावांतील जमिनींच्या भरपाईचे दर अंतिम केले आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात 14 गावांमधील जवळपास 300 एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. त्यापैकी 11 गावांसाठीचे दर निश्चित झाले असून, उर्वरित गावांचे दरही काही दिवसांत अंतिम केले जाणार असल्याचं प्रशासनाने म्हटलं आहे.

**मेधा कुलकर्णी**

लाखो वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असलेल्या आळंदीचा समावेश केंद्र सरकारच्या 'टेंपल टाउन डेव्हलपमेंट' योजनेत करावा, अशी मागणी खासदार मेधा कुलकर्णी यांनी आज राज्यसभेत केली. संत परंपरेचं महत्त्वपूर्ण केंद्र असलेल्या आळंदीचं धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन, या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्राने विशेष पावलं उचलावीत, असं त्या म्हणाल्या.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचं विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने, सावित्रीबाई फुले सन्मान सोहळा नुकताच झाला.

विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिलांना यावेळी गौरवण्यात आलं. नासा भेटीसाठी निवड झालेल्या भोर तालुक्यातील आदिती पारठे, आदिती राऊत, क्रिकेटर पुनम खेमनार, वनसंरक्षक विजया वसावे, सामाजिक कार्यकर्त्या ममता सपकाळ, गोंदिया इथं जलसंवर्धनाचं कार्य करणाऱ्या शालू कोल्हे यांना यावेळी सन्मानित करण्यात आलं. विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉक्टर पराग काळकर, आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यावेळी उपस्थित होत्या.

**<u>विद्यापीठ</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली आणि बौद्ध अध्ययन विभागाच्या सहकार्यानं, पद्मपाणी फाऊंडेशन आणि अभिजात भाषा संशोधन प्रशिक्षण संस्था; येत्या २२ मार्च रोजी पुण्यात 'अखिल भारतीय पाली साहित्य संमेलन' आयोजित करणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी बनारस हिंदू विद्यापीठातील पाली आणि बौद्ध अध्ययन विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. बिमलेंद्र कुमार यांची निवड करण्यात आली आहे. या संमेलनासाठी देशभरातील पाली भाषा अभ्यासक, संशोधक आणि साहित्यिक पुण्यात येणार आहेत.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महापालिकेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी येत्या शैक्षणिक वर्षात महापालिका १० ई-लर्निंग शाळा सुरू करणार आहे, त्याचबरोबर सीबीएसई अभ्यासक्रमावर आधारित ८ नवीन शाळाही सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी आज ही माहिती दिली. महापालिकेच्या यंदाच्या अंदाजपत्रकात शाळांच्या नवीन इमारतीच्या दुरुस्ती कामांसाठी ६८ कोटी रुपयांची तरतूद केली असून, १४४ शाळा 'मॉडेल स्कूल' म्हणून विकसित करण्याचीही योजना असल्याचं पवनीत कौर यांनी सांगितलं.

**<u>Pcmc</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा आज पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या बैठकीत पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पाईपलाईन दुरुस्ती, शहरातील दिव्यांची दुरुस्ती-देखभाल यासह विविध विषयांना मंजुरी देण्यात आली.

दरम्यान माझी वसुंधरा अभियानाच्या सहाव्या टप्प्यासाठी नागरिकांनी पर्यावरण रक्षणाबाबत ई-प्रतिज्ञा घ्यावी, असं आवाहन महानगरपालिकेनं केलं आहे. पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ आणि हरित ठेवण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचं मत महापौर रवी लांडगे यांनी व्यक्त केलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात उन्हाची तीव्रता वाढत असून, आज कमाल तापमान 38 आणि किमान तापमान 19 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नाही, असं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतसह विविधभारती पुणे केंवर संध्याकाळी 6 वाजता. नमस्कार.**